# पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम
# Water Quality Monitoring and Surveillance Program (WQMSP)
# पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
## दि. १५/०१/२०२०

**कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे:**

- ग्रामीण भागातील सर्व पाणी स्त्रोतांचे गुणवत्ता सनियंत्रण, देखरेख, दुरुस्ती व सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढवणे.
- ग्रामपंचायतींना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करणे व त्यांना सक्षम बनवणे.
- सोप्या पद्धतीने पाणी तपासणीच्या संचाचा वापर करून गावातल्या गावात पाण्याची तपासणी करणे.
- लोकांमध्ये स्वच्छता व सुरक्षित पाणी पुरवठ्याबाबत तसेच अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती वाढविणे.
- पाणी पुरवठा यंत्रणेतील वेळोवेळी उद्भवणारे दोष वा दुरुस्त्या लोकसहभागातून करणे हे प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**या कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या बाबी :-**

- **प्रशिक्षण कार्यक्रम** –

  या कार्यक्रमांतर्गत ग्रामपातळीपर्यंत लोकांना पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता देखरेख व सनियंत्रण यशस्वीरीत्या कश्याप्रकारे करावे याबाबत माहिती देण्यासाठी राज्यस्तर/ जिल्हास्तर/ तालुकास्तर या तीन स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो.

  राज्यातील जिल्हा पाणी गुणवत्ता कक्षाअंतर्गत ग्रामपंचायतस्तरावर विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये आतापर्यंत जिल्हास्तरीय ८५५, तालुकास्तरीय ९२९५ व ग्रामपंचायत स्तरावरील ५०२४९ पाणी पुरवठा व स्वच्छता कामाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये आतापर्यंत जिल्हास्तरीय ५६४, तालुकास्तरीय ३४९९ व ग्रामपंचायत स्तरावरील १०९९२ पाणी पुरवठा व स्वच्छता कामाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

  **प्रयोगशाळा**

| अ.क्र. | प्रयोगशाळा स्तर | भू.स.व वि.यं |
|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | १* |
| २ | विभागीय | ६ |
| ३ | जिल्हास्तरीय | २८ |
| ४ | उप विभागीय | १४२+७* |
| | एकूण | १७६+०७* |
| | *प्रयोगशाळा स्थापनेचे काम प्रगतीपथावर आहे. | |

राज्यातील ०३ विभागीय व २७ जिल्हास्तरीय पाणी तपासणी प्रयोगशाळांच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे.

- **प्रयोगशाळांचे बळकटीकरण व तपासणी §**

राज्यातील जिल्ह्याच्या आकारमान, स्त्रोत संख्या यांचा विचार करून १३८ तालुकास्तरीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करून त्यांना आता उपविभागीय प्रयोगशाळा संबोधण्यात येत आहे. दि. ०१.०४.२०१५ पासून सार्वजनिक आरोग्य विभागाधीनिस्त असलेल्या १३८ प्रयोगशाळांचे सनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे देण्यात आले आहे. उपविभागीय प्रयोशाळांमध्ये जिल्हा प्रयोगशाळेप्रमाणे पाण्यातील अणुजैविक, रासायनिक घटकांची तपासणी व टीसीएल पावडर ची तपासणीची सोय करण्यात आली आहे.

NABL अधिस्वीकृती प्रमाणपत्र

- सन २०१६-२०१७ या वर्षात राज्यातील पुणे, कोंकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर या सहा विभागीय तपासणी प्रयोगशाळांना NABL अधिस्वीकृती प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
- सन २०१८-२०१९ या वर्षात राज्यातील पुणे, कोंकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर या सहा विभागीय तपासणी प्रयोगशाळांचे NABL अधिस्वीकृती नूतनीकरण प्रमाणपत्र (renewal of Accreditation) प्राप्त झाले असून प्रयोगशाळानिहाय विहित कालावधी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | NABL Accreditation प्रमाणपत्र क्रमांक | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | पुणे | TC-७०९० | ०५.५.२०१८ ते ०४.५.२०२० |
| २. | कोंकण | TC-७१८८ | १९.५.२०१८ ते १८.५.२०२० |
| ३. | नाशिक | TC-७२३४ | १९.५.२०१८ ते १८.५.२०२० |
| ४. | नागपूर | TC-७४९३ | १६.६.२०१८ ते १५.६.२०२० |
| ५. | औरंगाबाद | TC-७३९५ | २३.६.२०१८ ते २२.६.२०२० |
| ६. | अमरावती | TC-७५९३ | २५.७.२०१८ ते २४.७.२०२० |

- **सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी**

राज्यातील **२,६९,२४७** सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी दोन वेळा खालीलप्रमाणे करण्यात आली आहे

१. **एप्रिल** २०१५ **ते मार्च** २०१६ - **४३४८५७ नमुने**
२. **एप्रिल** २०१६ **ते मार्च** २०१७ - ६४१८४१ नमुने
३. **एप्रिल** २०१७ **ते मार्च** २०१८ - **६४९३६९** नमुने
४. **एप्रिल** २०१८ **ते मार्च** २०१९- ७३८७२७ नमुने
५. **एप्रिल** २०१९ **ते डिसेंबर** २०१९ -**५६९२७३** नमुने

Geo-fencing Mobile App द्वारे सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी

| वर्ष | मान्सून पूर्व (१ मार्च ते ३१ मे) | मान्सून पश्चात (१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर) | एकूण |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | ३७,००१ | १,०५,२०२ | १,४२,२०३ |
| २०१८-१९ | १,०५,५२० | २,१७,४८२ | ३,२३,००२ |
| २०१९-२० | २,३६,६८६ | २,४१,२६४ | ४,७७,९५० |

**सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे Asset Mapping**

राज्यातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाचे Asset Mapping करण्यात येणार आहे. सदर Asset Mapping च्या संदर्भातील Mobile Application, Software,Web Portal, Data Validation & Uploading ही कामे MRSAC, नागपूर यांच्यामार्फत करण्यात येत आहे. तर स्त्रोतांचे सर्वेक्षण करणे, स्त्रोतांचे व पाणी पुरवठा योजनांच्या उपांगाचे अक्षांश व रेखांश घेणे, स्त्रोतांचे अणुजैविक व रासायनिक तपासणीसाठी नमुने घेणे ही कामे ADCC, Nagpur या कंपनीमार्फत करण्यात येत आहेत. दि. ३०.०८.२०१८ पर्यंत ६,४३,००० ठिकाणाचे स्त्रोत व योजनांची उपांगे यांचे अक्षांश व रेखांश घेण्यात आले आहेत.

**Heavy Metals/ Toxic Metals / Pesticides/ Fertilizers ची पिण्याच्या पाण्यातील तपासणी**
**(शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम २०१४/प्र.क्र.०१/पापु१२/दि.३० मार्च २०१५)**

नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सिंधुदुर्ग व कोल्हापूर या खनिज संपत्ती असलेल्या १२ जिल्ह्यातील Heavy Metals/ Toxic Metals / Pesticides/ Fertilizers ची पिण्याच्या पाण्यातील तपासणी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (नीरी),नागपूर यांच्या मार्फत करण्यात आले आहे. वरील १२ जिल्ह्यातील तपासणीचे काम पूर्ण झाले असून अहवालाचा मसुदा प्राप्त झाला आहे. तसेच राज्यातील उर्वरित २२ जिल्ह्यांमध्ये Heavy Metals/ Toxic Metals / Pesticides/ Fertilizers ची पिण्याच्या पाण्यातील तपासणी काम करण्याचे विचाराधीन आहे.

**पाणी सुरक्षितता आराखडा (District & Village Water Safety Plan)**

राज्यामध्ये ३४ जिल्ह्यातील अधिकारी / सल्लागार यांचे पाणी सुरक्षितता आराखडा याबाबत प्रशिक्षण पूर्ण झाले असून प्रत्येक जिल्ह्यातील एक गाव असे एकूण ३४ गावांची निवड करण्यात आली असून ३४ गावांचे पाणी शाश्वतता सुरक्षितता आराखडे तयार झाले आहेत. त्यानुसार धुळे जिल्ह्यातील रहिमपूर गावाचा आराखडा पेयजल व स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांना पाठविण्यात आला आहे.

**स्वच्छता सर्वेक्षण - (शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम २०१०/प्र.क्र.१९०/पापु१२/दि.२९.०८.२०१२ )**

पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमामध्ये स्वच्छता सर्वेक्षनाचे अनन्य साधारण महत्व आहे. स्वच्छता सर्वेक्षणातून स्त्रोताभोवतीचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन संभाव्य साथीस प्रतिबंध करता येतो.

आरोग्य विभागामार्फत ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेल्या लाल कार्ड म्हणजे संपूर्ण ग्रामपंचायत परिसर अथवा सर्व स्त्रोतांचा पाणी साठा दुषित झाला आहे असे ठरवण्यात येते. असुरक्षिततेच्या या कारणाकडे लक्ष देऊन ते दूर करण्यात येते. लाल कार्ड हे त्या ग्रामपंचायतीस संभाव्य साथरोगांची सूचना देत असते.

स्वच्छता सर्वेक्षणाचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु.) यांच्या तालुकास्तरीय समितीत लाल व पिवळे कार्ड प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचा आढावा घेऊन त्रुटी पूर्ण करण्याबाबत संबधितांना मुदत देण्यात येते.

State Referral Institute

पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाच्या धोरणात्मक निर्णयात मदत करणे, तांत्रिक बाबींची माहिती पुरविणे व पाणी गुणवत्ता विषयक अहवाल तयार करणे, या करिता राज्यामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (National Environmental Engineering Research Institute), नागपूर यांना State Referral Institute (SRI) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

जलसुरक्षक

दिनांक ३० मार्च २०११ रोजीच्या या विभागाच्या शासन निर्णयानुसार, २७८३८ ग्रामपंचायातीमधील पाणी पुरवठा कर्मचाऱ्यास जलसुरक्षक म्हणून संबोधण्यात आले. ग्रामपंचायतीकडून देण्यात येणाऱ्या मानधना व्यतिरिक्त २७८३८ जलसुरक्षकांना पाणी गुणवत्ता विषयक काम करण्यासाठी कामानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येते.

**Physical Achievement– 2019-2020(as on 15.01.2019)**

| Sr. | Particulars | Target | 2019-2020 | % |
|---|---|---|---|---|
| 1 | No. of persons trained | 56000 | 15055 | 29.43 |
| 2 | Number of water quality tests done in Laboratories | 400000 | 569273 | 100 |
| 3 | No. of Hab. where at least one source is tested in lab. | 50000 | 53568 | 100 |
| 4 | Number of laboratories to be set up | 1 | 0 | 0.00 |

**Financial Progress 2019-2020 (as on 15.01.2020) as per cashbook**

| Share | O.B. | Allocation | Release | Interest | Tot. Ava. | Expend. | % Expend. | C.B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Centre (60%) | 0.49 | 45.10 | 10.00 | 0 | 10.49 | 5.16 | 74.44 | 5.33 |
| State (40%) | 0.00 | 30.06 | 7.00 | 0 | 7.00 | 7.00 | - | 0 |

# 138 उपविभागीय प्रयोगशाळा

| अ.क्र | जिल्हा | अ.क्र | उपविप्रशा | अ.क्र | उपविप्रशा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 1 | संगमनेर | 3 | पाथर्डी |
| | | 2 | कर्जत | 4 | राहता |
| | | 5 | श्रीरामपुर | | |
| 2 | जळगाव | 6 | मुक्ताईनगर | 7 | पाचोरा |
| | | 8 | चोपडा | 9 | पारोळा |
| | | 10 | पहुर | | |
| 3 | नाशिक | 11 | चांदवड | 14 | कळवण |
| | | 12 | मालेगाव | 15 | येवला |
| | | 13 | सुरगणा | 16 | घोटी |
| 4 | अकोला | 17 | बार्शी-टाकली | 18 | तेल्हारा |
| | | 19 | मुर्तिजापूर | | |
| 5 | वाशिम | 20 | मानोरा | 21 | मालेगाव |
| 6 | बुलढाणा | 22 | शेगाव | 23 | जळगाव जामोद |
| | | 24 | खामगाव | 25 | देऊळगाव-राजा |
| | | 26 | मलकापूर | | |
| 7 | अमरावती | 27 | मोरशी | 28 | धांरणी |
| | | 29 | दर्यापुर | 30 | अचलपूर |
| | | 31 | नांदगाव खांडेश्वर | | |
| 8 | औरंगाबाद | 32 | वैजापूर | 33 | सिल्लोड |
| | | 34 | गंगापूर | 35 | पाचोड |
| 9 | परभणी | 36 | सेलू | 37 | बोरी |
| | | 38 | गंगाखेड | 39 | पाथरी |
| 10 | लातूर | 40 | निलंगा | 41 | अहमदपूर |
| | | 42 | किल्लारी | 43 | उदगीर |
| 11 | उस्मानाबाद | 44 | परांडा | 45 | उमरगा |
| | | 46 | वाशी | | |
| 12 | गडचिरोली | 47 | कुरखेडा | 48 | अहेरी |
| | | 49 | आरमोरी | 50 | चार्मोशी |
| 13 | नागपूर | 51 | नरखेड | 52 | देवलापूर |
| | | 53 | हिंगणा | 54 | पारशिवणी |
| 14 | वर्धा | 55 | आर्वी | 56 | पुलगाव |
| | | 57 | समूद्रपूर | | |
| 15 | कोल्हापूर | 58 | गडहिंग्ल | 59 | कोडोली |
| | | 60 | शिरोळ | 61 | सोलांकूर |
| 16 | सांगली | 62 | कवठे महांकाळ | 63 | इस्लामापूर |
| | | 64 | आटपाडी | 65 | जत |
| 17 | रत्नागिरी | 66 | कमथे | 67 | दापोली |
| | | 68 | लांजा | 69 | मंडणगड |
| 18 | रायगड | 70 | माणगाव | 71 | कर्जत |
| | | 72 | पेण | 73 | रोहा |
| | | 74 | महाड | | |
| 19 | यवतमाळ | 75 | पुसद | 76 | राळेगाव |
| | | 77 | वणी | 78 | उमरखेड |
| | | 79 | पांढरकवडा | 80 | दारव्हा |
| 20 | सोलापुर | 81 | करमाळा | 82 | अकलूज |
| | | 83 | पंढरपूर | 84 | सांगोला |
| | | 85 | बार्शी | 86 | अक्कलकोट |
| | | 87 | कुर्डूवाडी | | |
| 21 | भंडारा | 88 | पवनी | 89 | मोहाडी |
| | | 90 | तुमसर | 91 | लाखंदूर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 22 | गोंदिया | 92 | देवरी | 93 | गोरेगांव |
| | | 94 | सडक-अर्जुनी | | |
| 23 | बीड | 95 | परळी | 96 | गेवराई |
| | | 97 | माजलगांव | 98 | पोटादा |
| 24 | पुणे | 99 | बारामती | 100 | इंदापूर |
| | | 101 | वडगांव मावळ | 102 | दौंड |
| | | 103 | भोर | 104 | मंचर |
| 25 | हिंगोली | 105 | कळमनुरी | 106 | बसमत |
| | | 107 | सेनगाव | | |
| 26 | सिंधुदुर्ग | 108 | कणकवली | 109 | सावंतवाडी |
| | | 110 | मालवण | | |
| 27 | ठाणे | 111 | शहापूर | 112 | गोवेली |
| 28 | पालघर | 113 | जव्हार | 114 | डहाणु |
| | | 115 | वाडा | 116 | कासा |
| | | 117 | पालघर | | |
| 29 | धुळे | 118 | शिरपूर | 119 | दौंडाईचा |
| 30 | नंदुरबार | 120 | धडगांव | 121 | अक्क्लकुआ |
| | | 122 | नवापुर | 123 | तळोदा |
| 31 | नांदेड | 124 | गोंकुदा | 125 | मुखेड |
| | | 126 | देगलूर | 127 | उमरी |
| | | 128 | हदगाव | 129 | कंधार |
| 32 | सातारा | 130 | कराड | 131 | खंडाळा पारगाव |
| | | 132 | सोमर्डी | 133 | दहीवडी |
| 33 | जालना | 134 | अंबड | 135 | मंठा |
| | | 136 | जाफराबाद | | |
| 34 | चंद्रपूर | 137 | वरोरा | 138 | गौड- पिंपरी |
| | | 139 | सावली | 140 | सिदेवाही |
| | | 141 | भद्रावती | 142 | ब्रहमपुरी |

## १० उप विभागीय प्रयोगशाळा

| जिल्हा | उप विभागीय प्रयोगशाळा | | |
|---|---|---|---|
| गडचिरोली | सिंचोरा | इटापल्ली | भामरागड |
| गोंदिया | नवेगाव /बांध | तिरोडा | आमगाव |
| वाशीम | मंगरूळपीर | - | - |
| हिंगोली | सेनगाव* | - | - |
| सोलापूर | अक्कलकोट* | माढा* | - |

*प्रस्थापित